# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६४२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०५/१०/२०१६

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक ०४/१०/०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील फिर्यादीचा पती हा काळी पिवळी गाडी चालविण्याचा काम करतो व आरोपी क्र. १ हा काळी पिवळी वाहन संघटनेचा उपाध्यक्ष असुन रोडवर काळी पिवळी वाहन चालविण्याचा कारणा वरुन भांडण झाल्याने याच कारणा वरुन आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे अंगणात जावुन फिर्यादीस तेरे ससुर, दिर, पती कहा गये उनको बाहर निकालो कहा छुपाके रखे हो उनको मारणा है असे बोलुन वाईट शब्दात शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १४३,४४८,५०४,५०६भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) भांडण व शिविगाळ करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/१०/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील फिर्यादी ही एसटी महामंडळाची बस क्र. एमएच ०७/७६२३ ने भंडारा तुमसर मार्गे तिरोडा येथे प्रवासी घेवुन जात असतांना प्रवासी आरोपी यांनी अर्धवट तिकीट घेवुन भांडण करुन शिविगाळ व ढकढुकल करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३५३,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) चिमुकलीची अचानक मृत्यु . :—**

दिंनाक. ०४/१०/२०१६ रोजी ०५.३० वा. दर यातील मृतक पोर्णीमा रमन वाढवे वय २६ वर्ष, रा. डोडमाझरी ही गरोदर असल्याने प्रसुती करीता सा.रु.भंडारा येथे दि. ०२/१०/२०१६ ला भरती झाली व त्याच दिवशी नॉर्मल प्रसुती होवुन मुलगी जन्माला आली व दि. ०४/१०/२०१६ चे ०५.३० वा. दर. मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहे.

**४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०४/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, लाखांदुर व साकोली येथील अवैध दारु / जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ०२ लिटर १६० मिली देशी दारु कि. ६००/—रु. तसेच जुगारातुन कि. ११०/—रू. चा असा एकुण कि. ७१०/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.